# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.04.2025** **वार - मंगळवार**

---

**<u>वसुंधरादिन</u>**

जागतिक वसुंधरा निमित्त आज एम्प्रेस गार्डनमध्ये उर्वशी या दुर्मिळ आणि आकर्षक वृक्षाचं रोप लावण्यात आलं. मूळचा म्यानमाणदला असलेला उर्वशी वृक्ष जगातील मोजक्या अतिसुंदर वृक्षांपैकी एक आहे. यावेळी शिवण, पिवळा कांचन, सोनचाफा, तामन, शेंदरी आदी वृक्षाची रोपंही लावण्यात आली. दरम्यान, यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या चिंचवड इथल्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्सच्या प्रांगणात पथनाट्याद्वारे वसुंधरा दिनाविषयी जनजागृती करण्यात आली. संकल्प वसुंधरेच्या रक्षणाचा आणि निश्चय समृद्ध पर्यावरणाचा असा संकल्प करत यावेळी विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाविषयीची शपथ घेतली.

**<u>रस्तेदुरुस्ती</u>**

पावसाळ्याआधी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी सुमारे ६५ कोटी रुपयांच्या कामांना पुणे महापालिकेच्या पुर्वगणक समितीनं मान्यता दिली आहे. राज्य सरकारनं निविदा प्रक्रिया राबवण्याचा कालावधी कमी केल्यानं या कामांच्या निविदा प्रक्रिया लवकर पुर्ण होऊन पावसाळ्यापूर्वी कामं पूर्ण होतील असा विश्वास महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी व्यक्त केला आहे. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर २ कोटी ४० लाख रुपयांच्या कामाला मंजुरी दिल्याची माहिती पावसकर यांनी दिली.

**सांडपाणीस्वच्छता**

सांडपाणी स्वच्छतेसाठी गाड्या आल्यानंतर जसं काम पूर्ण होईल तसं टप्प्याटप्प्यानं पुणे महापालिकेला पैसे दिले जातील असं महापालिका प्रशासनानं नगर परिषद प्रशासन संचालनालयाला कळवलं आहे. पुणे शहरातील सांडपाणी वाहिन्यांच्या स्वच्छतेसाठी १३ गाड्यांच्या खरेदीपोटी महापालिकेला 25 कोटी रुपये राज्य सरकारला द्यावे लागणार होते. पहिल्या वर्षी यातील केवळ दोनच वाहनं महापालिकेला मिळणार आहेत.

**पुरस्कार**

राज्य शासनाच्या 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धा' अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेला मालमत्ता कर संकलन वाढीसाठी राबवलेल्या उपक्रमांसाठी प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. प्रशासनातील पारदर्शकता, तांत्रिक साधनांचा वापर, लोकसहभाग वाढवण्याचा प्रयत्न आणि उत्तम कार्यप्रणाली हे पैलूदेखील यामध्ये महत्वाचे ठरले.

**पीसीएमसी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नव्या संकेत स्थळाचं लोकार्पण आज आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आलं. हॅकेथॉन स्पर्धेत सहभागी झालेल्या १७५ तज्ज्ञांच्या अभिप्रायानुसार संकेतस्थळात सुधारणा करण्यात आल्या असून एथिकल हॅकर्समार्फत सखोल सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे. करसंकलन, देयकं भरणे, तक्रारी नोंदवणे यांसारख्या सेवा आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत.

**अकरावीप्रवेशमार्गदर्शन**

अकरावी प्रवेशाबाबत विद्यार्थी आणि पालकांना माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या शंकांचं निरसन करण्यासाठी फर्ग्युसन कनिष्ठ महाविद्यालयानं येत्या रविवारी विनामूल्य कार्यशाळा आयोजित केली आहे. सकाळी 10 वाजता महाविद्यालयाच्या अँफीथिएटरमध्ये ही कार्यशाळा होणार असून प्रवेश समितीत काम करणारे शिक्षक मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी १० आणि १२ वी नंतरच्या करिअरबाबतही मार्गदर्शन केलं जाणार आहे.

**<u>भारतीविद्यापीठपुरस्कार</u>**

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचा जीवनसाधना गौरव पुरस्कार ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष आणि लोकसाहित्याच्या ज्येष्ठ अभ्यासक डॉ.तारा भवाळकर यांना जाहीर झाला आहे. विद्यापीठाच्या स्थापना दिनानिमित्त येत्या शनिवारी होणाऱ्या कार्यक्रमात पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

**<u>पुरस्कार</u>**

द. मा. मिरासदार प्रतिष्ठानचा 'द. मा. मिरासदार पुरस्कार' यंदा अभिनेते आणि कवी संकर्षण कऱ्हाडे यांना जाहीर झाला आहे. प्रतिष्ठानचे रवींद्र मंकणी आणि हरी मिरासदार यांनी ही माहिती दिली. ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते येत्या रविवारी पुरस्कार प्रदान केला जाईल.

**<u>ज्योतीमेटे</u>**

शेतकऱ्यांना अर्थक्षम करण्यावर अधिक भर देण्याची गरज व्यक्त करुन कृषी उत्पादनांना चांगला भाव देण्यासह कृषी उत्पादनावर प्रक्रिया, शेतीक्षेत्राला बिगरशेती क्षेत्राची जोड, तसंच १०० टक्के पीककर्ज उपलब्ध करून द्यावं, अशी मागणी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्षा ज्योती विनायक मेटे यांनी केली आहे. पुण्यात झालेल्या पक्षाच्या राज्यस्तरीय बैठकीनंतर त्या पत्रकार परिषदेत बोलत होत्या.

**क्रीडा**

जालंधर इथं झालेल्या राष्ट्रीय पोलीस क्रीडा स्पर्धेत पिंपरी चिंचवड आयुक्तालयाच्या महिला उपनिरीक्षक प्रियांका करांडे यांनी खो खो प्रकारात सुवर्णपदक पटकावलं. तत्पूर्वी ठाण्यात झालेल्या राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेत त्यांना कांस्य पदक मिळालं होतं. पुढच्या महिन्यात ओडीशामध्ये होणाऱ्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेत त्या महाराष्ट्र पोलीस संघाचं नेतृत्व करणार आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअसच्या आसपास होतं. उद्याही आकाश निरभ्र असेल आणि कमाल तापमानात किंचित घट होईल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतमधे. नमस्कार**.